**स.फौ.के. नं. ३१२/२०२२**

**नि. क्र. ७१**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ चा जबाब शपथेवर सुरु</u>.**

**नाव** – अनिल प्रकाश मस्कर

**वय**– २९ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी, (पो.कॉ./१३५६),

**नेमणुक** – महामार्ग पोलीस मदत केंद्र, चिपळुन, ता. जि. रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून</u>**–

**०१**. दिनांक १७/०७/२०२२ रोजी मी संगमेश्वर पोलीस ठाणे येथे पोलीस हेड कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत होतो. त्यावेळी पोलीस अधिक्षक, रत्नागिरी यांनी संगमेश्वर पोलीस ठाण्याचे स.पो.नि. श्री. देशमुख यांना फोनवरुन कळविले की, साडवली येथे राहणारा विजय कदम यांच्या घरामध्ये जुगाराचा खेळ चालू आहे. तरी, तेथे छापा टाका.

**०२**. त्यानंतर श्री. देशमुख यांनी पोलीस निरीक्षक श्री. झावरे यांना तसे कळवून उपविभागीय पोलीस अधिकारी विभाग, लांजा यांची परवानगी घेतली. श्री. देशमुख तहसिलदार कार्यालय यांना पत्र देवुन पंच मिळणेबाबत कळविले. त्यानंतर आम्ही दोन पंचांना घेवुन साडवली येथे देवकर हॉस्पीटलच्या पाठी, कदमचाळ असलेल्या ठिकाणी आम्ही खाजगी वाहनाने गेलो. त्यावेळी माझ्यासोबत श्री. देशमुख, श्री. आव्हाड, श्री. पंदेरे, खोंदल, श्रीमती महिला पोलीस शिपाई कांबळे, श्री. कामेरकर, श्री. झापडेकर व दोन पंच हजर होते. कदम चाळीच्या तेथे गेल्यानंतर एका खोलीचा दरवाजा पुढे केलेला होता. तो उघडल्यानंतर आतमध्ये आठ इसम एका गोलाकार टेबलभोवती खुर्च्यावर बसलेले होते. त्यांच्या हातात पत्ते होते व टेबलवर मध्यभागी पैसे ठेवले होते. साहेबांनी विजय गणपत कोण असे विचारले असता त्यापैकी एकाने तो असल्याचे सांगितले. सदर आठ इसमांच्या पुढयात तीन पत्त्यांची पाने व टेबलवर रोख रक्कम ठेवलेली होती. सदर सर्व इसमांना नाव विचारले असता प्रत्येकांनी आपापले नावे सांगितले. विजय गणपत

कदम, लांबे, पाथरे, लिंगायत, कांबळे अशी नावे त्यांनी सांगितली.

०३. त्यांची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे रोख रक्कम, मोबाईल मिळून आले. त्यांच्या गाडया बाहेर लावलेल्या होत्या. तसेच जुगाराचे साहित्य टेबल, खुर्च्या व सदरच्या सर्व वस्तू पंचांसमक्ष जप्त करण्यात आल्या. पंचांची व पोलीसांच्या सहयांचे लेबले जागीच चिकटविण्यात आली.

०४. मला मुद्देमाल दाखविल्यास मी ओळखु शकतो. *(साक्षीदारास आता वस्तू ब व क कडील मुद्देमाल दाखविण्यात आला).* तो तोच असून तो आम्ही घटनास्थळावरुन जप्त केला आहे.

०५. पोलीस ठाण्यात आम्ही सर्व मुद्देमाल घेवुन गेलो. तेथे पोलीस शिपाई श्री. आव्हाड यांनी रितसर आरोपींविरुध्द फिर्याद दिली. सदर छाप्याकामी मी आवश्यकत ती सहकार्य केले आहे. आरोपींना दाखविल्यास मी ओळखू शकतो. आज रोजी सर्व आरोपी न्यायालयात हजर आहेत.

**<u>सरतपास पुर्ण</u>.**

**<u>उलटतपास – आरोपींतर्फे विद्वान विधीज्ञा श्रीमती पी. सी. चव्हाण यांचेकडून</u> –**

०६. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे राहत्या वस्तीतील ठिकाण आहे. पोलीस अधिक्षक, रत्नागिरी यांनी घटनेबाबत स.पो.नि. श्री. देशमुख यांना फोनवरुन कळविल्याची बाब मी तपासटिपण नोंदविताना तपासीक अधिकारी यांना सांगितली होती. सदरची बाब माझ्या तपास टिपणात का नमूद नाही याचे काही कारण मला सांगता येत नाही.

०७. हे म्हणणे खरे आहे की, एखाद्या व्यक्तीच्या हातात पत्ते असल्यास तो जुगार खेळतो असा होत नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्या खाजगी वाहनाने आम्ही

घटनास्थळी रवाना झालो त्या वाहनाचा क्रमांक व प्रकार मला आता आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, एखाद्या खाजगी वाहनाने बाहेर जायचे झाल्यास त्याची नोंद स्टेशन डायरीमध्ये नोंद केली जाते. घटनास्थळी रवाना झाल्याची नोंद स्टेशन डायरीला घेतली होती किंवा नाही हे मला आता आठवत नाही.

०८. हे म्हणणे खरे आहे की, सर्व आरोपींची पूर्ण नावे व पत्ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी गेलेलोच नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींचा घटनेशी काही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकूर खोटा नमूद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.10.31 11:49:24 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक –३०.१०.२०२५ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 30/10/2025 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 30/10/2025 |
| Evidence uploaded on | : | 31/10/2025 |